
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



# अंगारा

राम शेवाळकर

REFBK-0026058
REFBK-0026058

# अंगारा

संदर्भ
२६०३
२६०५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

प्रकाशक :
भा. ल. कुळकर्णी
साहित्य प्रसार केंद्र
सीताबर्डी, नागपूर 440 012

©
सौ. विजया शेवाळकर
धरमपेठ, नागपूर 440 010

प्रथमावृत्ती १९८९

मुखपृष्ठ :
संजय घोतरकर,
जी. १३, लक्ष्मीनगर
नागपूर–440 022

मूल्य : ३० रुपये

मुद्रक :
म. पां. बनहट्टी,
नारायण मुद्रणालय,
टिकेकर रोड, धनतोली,
नागपूर 440 012

माझ्या कवितांचा
आरंभापासूनचा साक्षीदार
प्रिय मित्र
चंदा पांडे
ह्यांस—

# कैफियत

कवितेचा पहिला दंश माझ्या वंशालाच झाला होता. माझे पणजोबा रामशास्त्री शेवाळकर हे वेदांत, वैद्यक व ज्योतिष्यात पारंगत होते. त्यांनी पुढे संन्यास घेतला. ते संस्कृत व मराठीत पद्यरचना करीत. त्यात अर्थातच आरत्या, अष्टके व पदे यांचे प्रमाण मोठे होते. त्यांची समग्र कविता 'संचित' या नावाने १९७५ मध्ये मी संपादित व प्रकाशित केली आहे. त्यांच्या रचनेतील पदलालित्य श्रुतिसुखद व रमणीय असे. माझे वडिल कीर्तनकार असल्यामुळे तेही कीर्तनोपयोगी आख्याने, विविध वृत्तांत सतत रचीत. त्यावरचा संतपंतांचा प्रभाव अर्थातच लक्षात येण्यासारखा असे.

या पार्श्वभूमीमुळेच शब्दांशी खेळण्याचा नाद मला लहानपणीच केव्हातरी लागला. घरच्या वातावरणामुळे व संस्कारांमुळे आपोआप मुखोद्गत झालेल्या व पाठ्यपुस्तकात भेटलेल्या पद्यांचे वळण गिरविण्याचा छंद तसाच वाढत गेला असावा. पुढे मेळ्यातील पदे, सिनेमाची गाणी व तुकडोजीमहाराजांची भजने तोंडवळणी पडल्यावर मूळच्या छंदाने ती वाट चोखाळायला सुरुवात केली. चालीवर म्हणता येतील अशी पदे आपण रचू शकतो, प्रास व यमके जुळवू शकतो, उपमा, उत्प्रेक्षा, रूपके हे अलंकारही साधू शकतो; हे समाधान बरेच दिवस समवयस्कांमध्ये मिरवता आले. पुढे केशवसुतादी बुजुर्ग लोकांची भेट झाली. त्यांतील बालकवी, गोविंदाग्रज यांच्याशी तेवढे गोत्र जुळण्यासारखे होते. तांब्यांनी हे नाते अधिक बळकट केले. बोरकर, कुसुमाग्रज यांनी त्यात अधिक

सांद्रता आणली. कांत, पोवळे, बापट, इंदिरा, पाडगावकर यांचे आवाहन त्यावेळी अधिक आकर्षक वाटले. त्यामुळे, अनिल, मर्ढेकर, मुक्तिबोध यांनी गर्जविलेला राजरस्ता गजबजलेला असतानाही, आंतरिक ओढीने बापट–पाडगावकरांच्या दिंडीत उघड उत्साहाने सामील व्हावेसे वाटले. हे लोक आपलीच स्वप्ने पाहताहेत व आपलाच आवाज काढीत आहेत, असे जाणवले. त्यांची शब्दकळा, प्रतिमासृष्टी व सुरेल अभिव्यक्तीच्या उन्मादक चांदण्यात सचैल ओलेचिंब व्हावे, त्यांच्या ओठातून बाहेर पडणारा आपलाच आवाज कान देऊन ऐकावा, त्याला आपल्या शब्दांची साथ द्यावी, या ओढीतून 'असोशी'तील कवितांचा जन्म झाला. एखादी अनोखी चाल मनाशी गुणगुणावीशी वाटणे, तिच्यात गुंगून जाणे, शब्दांनी ती बांधून ठेवण्याचा प्रयत्न करणे, असा पुढे चाळाच सुरू झाला. त्यातून माझे गाणे आले. या गाण्यामध्ये काही ओळखीच्या चाली आल्या असणे शक्य आहे. बालकवी, गोविंदाग्रज, तांबे, कुसुमाग्रज, बोरकर, बापट, पाडगावकर यांनी रुळविलेली ही सावल्यांची मखमली पायवाट होती. या सर्व पूर्वसुरींच्या उत्तेजक सुरांच्या सहवासात ही वाटचाल सुखद झाली. आरंभीच्या आत्मशोधाच्या यात्रेत असे अनेक चकवे भेटतात. काही दृष्ये, रंग, सूर व शब्द यांची पूर्वजन्मीची ओळख पटल्यासारखे वाटते. स्मितहास्याचा नजराणा त्यांना अर्पण करून त्यांच्याशी हस्तांदोलन करावे व पूर्वीची वाटणारी ओळख दृढ करावी, असेही वाटते. इतर सुहृदांच्या घरात आपण असे स्वत:ला शोधीत असतो. या धडपडीत अचानक स्वत:च्या वेगळ्या घराची कळ हाती लागते. 'रेषा'मध्ये या धडपडीचे पडसाद आहेत. स्वत:तच डोकावून पहावे, आपली स्वत:ची अशी खोल हाक ऐकावी, स्वत:च्या वेगळ्या खुणा अजमावून पहाव्यात, मूलकंदापासून आपण सुटत चाललो आहोत, वेगळे होत आहोत, काही काळ अधांतरी तरंगत आहोत, क्वचित् आपल्या मातीचा ध्यास घेत भटकत आहोत, हे हवाई आसरे शोधीत शेवटी स्वत:च्या जमिनीवर नेमके उतरत आहोत, 'मजमाझे लाभेल कधी ?' ही व्याकुळता संपली आहे, मी मला सापडलो आहे, या समाधानाचा सुस्कारा 'रेषा'तील कवितांत उमटला आहे.

आपले स्वतःचे घर आपल्याला मिळाले या समाधानात असतानाच खिडकीतून क्षितिज खुणावू लागते, व अंगणात आकाशाच्या हाका ऐकू येतात. पुन्हा हरवल्यासारखे होते. पुन्हा घर सुटते. सार्वजनिक व्याप व व्याख्याने यांच्या रंगीबेरंगी यात्रेत आपण भुलून जातो, मधूनच स्वतःला मुकल्याची हळहळ वाटते, या भुलभुलैयातून बाहेर पडावेसे वाटते, घरातील देवघरात डोळे मिटून निवांत बसावे, आतल्या अंधारी गुहेत डोळे मिटूनच शिरावे, फिरावे, जे गवसेल त्याला स्पर्श करावा, असे वाटते; पण तशी स्वस्थता मिळत नाही. आकाशपाळण्यातून उतरावेसे वाटते, पण पाय जमिनीला टेकवण्याच्या सुमारासच झोका पुन्हा वर जातो. जमीन आपली वाटते, पण मिळत नाही. आकाश आपले व्हावेसे वाटते, पण ते सारखे दूरदूर पळत जाते. या गिरक्यांमध्ये एक बेभान कैफ असतो. तो स्वतःला स्वतःपासून दूर नेतो. एखाद्या ध्यासात हरवून जाणे सुखाचे असते; पण स्वतःला मुकणे फार कष्टाचे असते. ही केविलवाणी ओढाताण 'अंगारा'मध्ये उघड झाली आहे.

ऐन रणांगणावर अस्त्रांची विस्मृती झालेल्या कर्णावस्थेत सध्या मी आहे. आपल्याजवळचा झरा आटत चालला आहे, नैवेद्याची एकच वाटी शिल्लक आहे, पण तीही कलंडू लागल्याने तिच्यातील दूध देवाला मिळण्याऐवजी जमिनीवर जिरून जात आहे, असे आता जाणवू लागले आहे. कवितेसाठी आवश्यक असलेली मानसिक पौगंडावस्था आटोपलेली आहे. प्रत्येक झाडाच्या मोहराचा व बहराचा एक काळ असतो, तो संपलेला आहे असे आत्मसमाधान मिळवण्याच्या मनःस्थितीत सध्या मी आहे. त्यामुळे समोरून वाहून चाललेले पुराचे फेसाळ पाणी, काठावरून स्थिर दृष्टीने व शांतपणे पाहण्याची सूज्ञ भूमिका बजावणे आता प्राप्त आहे. 'आनंदभैरवी' या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत, बोरकरांनी लिहिले होते, "कदाचित ही माझ्या काव्यलेखनाची भैरवी असेल. पण ती मी आनंदाने गायिली आहे."

आज बोरकरांचे हे उद्‌गार मनातून प्रतिध्वनित होताहेत पण बोरकर हे पिंडाने अखंड जातिवंत कवी होते. त्यांना पुन्हा नवीन पालवी

फुटली. नवा भरघोस बहर आला. भैरवीची वेळ होण्याअगोदरच भरल्या मैफलीतून ते गात गात उठून गेलेत.

सर्वांच्याच पत्रिकेत हा भाग्ययोग असेल काय ?

वणी : राम शेवाळकर
विजयदशमी, १९११

---

## खुलासा

या संग्रहातील कविता 'असोशी' व 'रेषा' नंतरच्या आहेत. दोन तीन कविता अगोदरच्याही आहेत. उमलत्या वयातील खट्याळ-पणाच्या छटा सांभाळणाऱ्या काही कणिकाही पूर्वीच्याच आहेत.

## आभार

प्रा. सुधीर रोडे, वामन तेलंग, मधुसूदन बनहट्टी, श्रीकृष्ण बनहट्टी, राजाभाऊ कुळकर्णी, संजय धोतरकर आणि सोशिक रसिक.

# अंगारा

राहीन, राहू दे कृपया
विझलेला एक निखारा
तव भाळ भूषणाला लाभो
त्याचाच पुढे अंगारा !

# दीपकळी

मी दीपकळी, मी दीपकळी !

मी तेजाची सान बालिका
परमेशाची हास्यशलाका
अन् ब्रह्म्याच्या हृदयामधली
सुखस्वप्नाची सोनसळी !

प्रेम सुखाची हेमप्रभा
उधळून निळ्या उजळीन नभा
मी पहाट शुक्राची शोभा
खुलवीन जगाच्या मनोदळी !

व्रत माझे हे प्रकाशदान
जळोत यातच पंचप्राण
या ज्वलनाने फुलोत तुमच्या
प्रमोदपुष्पे पायतळी !

इथे तमाशी तुंबळ संगर
मिळो तयांतुन श्रेय शुभंकर
इवल्या स्मितहास्याने जिंकिन
काळोखाची सर्व कुळी !

मी दीपकळी, मी दीपकळी !!

■

## आला माझा राया

का रे अशी अधीरता
मनी उदंड भरावी–
आतुरली ओष्ठदळं
नित विलग रहावी ?

का रे असा वामनेत्र
आज स्फुरण पावावा ?
पहाटेच शुचिर्भूत
दारी ब्रह्मचारी यावा !

का रे असा मघापून
राघू खट्याळ बोलतो,
' कोण येणार ग आज ?'
–बाई लाजून सोडतो !

का रे अशी लुकलुके
घारी म्याउची नजर–
मूक जीवानाहि कळे
अंतरीची खालवर ?

शुभ शकुन पाहते
भोळी खुळी माझी प्रीत,
स्मृतिपुष्पांनी पूजिते
माझ्या मनीचे दैवत.

कुणा ठावे कितवी ही
दारी माझी येरझार,
शीणलेली अधीरता
उसंतली पळभर.

( तेजाळावा उंबरा, अन्
माझ्या मनी सांज यावी,
दूर नितळ निळ्यात
उल्काफुले लुप्त व्हावी ! )...

—तोच लागली चाहूल
आणि उंबरा हासला—
कोटी दीप प्रकाशले
आला, माझा राया आला !!

## हा काळा पाषाण

हा काळा पाषाण !!
युगायुगांच्या अस्थिरतेला चिरपार्थिव आव्हान !

फिकट तृणांच्या क्षीण धरेवर
चंचलतेचे मूर्त कलेवर
सभोवती आसमंत अवघा उजाड निःसंतान !!

त्रिणीत काळे ईप्सित दाहक
चैतन्याचे स्तब्ध स्मारक
उभ्या जगाच्या सजीवतेचा गळाठला अभिमान !

जे अस्थिर, चैतन्यशील जे
इथे तयांचे यशही लाजे
अणुरेणूतिल विक्षेपाचे शील इथे निष्प्राण !

प्रणयाची थिजलेली फुंकर
वा शापित गौतमिचे अंतर ?
ग्रीष्मक्रुद्ध मार्तंड लक्ष्यतो की हे शरसंधान !

देत जगास्तव अविरत खंगुन
शांतीचे निःशब्द प्रवचन
शिबिराजाच्या ऋजु यज्ञाचे मृत्युंजय स्मृतिदान !

हा काळा पाषाण !!

■

## आज जाणार मी

आज जाणार मी

आज केले आठवून मला
ओल्या मातीने प्रमत्त पाचारण

उत्फुल्ल भूकमळावरील
गंधार्त जलसेकांतून,

बाजूच्या आंब्यावरील
मोरपंखी लाघवात गुंतून अटकलेली
तुरेदार लिंबाची कडवट नजर,

आकाशरमणीच्या रेशमी हृदयात
संथलेली श्यामघनांची फेसाळ कालवाकालव,

मिटल्या पश्चिम कळीचे
सरल्या प्रीतीतले उरले निःश्वास,

परांच्या पाकळ्यांत उमलले
अभ्रिल प्रकाशपुष्प,

आर्द्र एकांताचा उन्मत्त स्पर्श ..
—हे सारे आर्जवी आमंत्रण कुणाचे ?

आज जाणारच मी.

संथ पाण्याच्या अथांग अंतरात
माझ्या प्रतिमेची स्तब्ध योगसमाधी

( मेनकेच्या मिजाशीने- ) अलगद चळविणारी
एखादीच लबाड वायुवीची,

' किमपि किमपि मंदं मंदमासक्तियोगात्- '

धरतील लपेटून निजलेल्या
सावल्यांचा गार प्रमोह,

अभ्रांच्या आडोशातून
कुणा बिचाऱ्याच्या चिंब चेहऱ्यावर
प्रेमवंचिताचे लाचार हसू...

मोगऱ्यातून स्रवणारी
अजविलापाची विषण्ण संथा,

माझ्या कानात निराळेच सूर-
माझ्या मनाला आगळीच ओढ.

-तूच दिलेस आठवून मला
मत्त मातीतून ओले आवतण
( तुझाच तो लडिवाळ आग्रह ! )
उत्फुल्ल भूकमळावरील
गंधार्त जलसेकातून !
खरेच, आज यावे का मी ?

होय,
येणार मी-येणारच मी ! !

■

# डोळे

डोळे : गोल, काळे भोर
खोल खोल
पार तळाशी नेणारे.

डोळे : निष्पाप,
आपोआप
उरात धपाप आणणारे.

डोळे : किरमिजी,
खजिल करणारे
हुकमी अजिजी मागणारे.

डोळे : बदामी,
छद्मीपणे
गुलामीची सनद देणारे.

डोळे : निळे,
अथांग तळे
बुडून मरण्याची ओढ लावणारे.

डोळे हिरवे,
डोळे लाल,
डोळे इवले,
डोळे विशाल,

डोळे : तंद्रीतले
क्षितिजापल्याडच्या
इंद्रायणीचा वेध घेणारे.

डोळे : आळसावलेले,
अर्ध-उघड्या नजरेने
परिघातल्या चोर काळजांना
गवसणी घालणारे.

डोळे : मदनमस्त,
मोठमोठ्या मेरूंची
नामांकित शिकस्त फजित करणारे.

डोळे : गुंतवणारे,
विळखा घालणारे,
पळत्या पावलांचा वेग चोरणारे,
अनावर आवेगाने ओढून घेणारे,
बांधून ठेवणारे.

कैद करणारे : डोळे,
डोळे : भोळे,
कीर्तिमंतांच्या मार्तंडाचे
डोहाळे पुरविणारे,
बलोद्धतांना पाहता पाहता
(न पाहताही)
जमीनदोस्त करणारे.

डोळे : भिरभिरते,
गरगरत
भोवंड आणणारे,
गटंगळ्या देऊन
गुदमरून टाकणारे.

डोळे : अकारण आठवणीनेही
अनिकेत करणारे.

डोळे : ध्यासाने फास लावणारे
डोळे : आरक्त,
रक्तातल्या थेंबांचा नेम घेणारे,
संथ तेजाने
पुढातल्या त्वचेला वितळून टाकणारे
अनावृत आत्म्याला ओशाळे करणारे.

डोळे : हसणारे,
हसवणारे, हसवता हसवता
विंधून टाकणारे
विव्हल करणारे
कासाविशी लावणारे.

डोळे : पाणावलेले
जिवाचे पाणी पाणी करणारे.

डोळे : न्हाऊमाखू घालणारे
डोळे : मायेने भरवणारे
डोळे : प्राणांच्या निरांजनाने ओवाळणारे.

डोळे : जोजवणारे,
रात्र रात्र जागवणारे
डोळे : शाप देणारे
पेटलेले; पेटवणारे
जाळून राख करणारे
पाचोळा लेखून
कैक योजने भिरकावून देणारे

डोळे : मिटलेले, निश्चिंत
झाले गेले विसरून
पापण्या पांघरून
निवांत पहुडलेले
टपोरे, फुगीर
आतुर ओठांना हळुवार हाक घालणारे !

■

काव्य २९०३ २९०५८ २।३।९०

## हेळणा

भाग्य माझे केवढे की शेवटी झालो शहाणा
ओळखू शकलो तुझ्या नकली उपेक्षेचा बहाणा.
जीवघेणी आर्जवे अन् दीनवाणी आसवे
दाटलेला हुंदका कंठात झाला दागिना.
आठवेना : की कधीही लागला डोळ्यास डोळा
सोबतीला तेवढी अतृप्त शय्या सांत्वना.
उकळणाऱ्या वेदनेने तापले उपरे उसासे
थांबला नाही परी तुझिया नकारांचा तराणा.
टाळली दृष्टीस दृष्टी, टाळली प्रश्नोत्तरे
टाळल्या त्या समजलेल्या उमगणे भोळ्या खुणा.
स्पर्श वुजरा जाणता जो नेणतासा टाळला
टाळला बाकी हवासा वाटलेलाही गुन्हा.
टाळुनी टळल्या कधी असत्या अशा गोष्टी खुळे,
कां करावी लागती तुजला स्वत:ची हेळणा ?

■

## प्रत्येक भेटीत

प्रत्येक भेटीत
पापाचा शाप
प्रत्येक भेटीत
पश्चात्ताप.

प्रत्येक भेटीत
चुकांचे वेरूळ
प्रत्येक भेटीत
सुखाचे सूळ.

प्रत्येक भेटीत
हिंस्र सक्ती
प्रत्येक भेटीत
वन्य विरक्ती.

प्रत्येक भेटीत
आगीशी संग
प्रत्येक भेटीत
भावनाभंग.

प्रत्येक भेटीत
बेभान गाणे
प्रत्येक भेटीत
ओशाळवाणे.

प्रत्येक भेटीत
आंधळा पशू
प्रत्येक भेटीत
निरभ्र शिशू !

■

## झाडे

एखाद्या नि:स्पंद संध्याकाळी
सारी झाडे कशी निमूट असतात.
त्यांचे अंगांग निष्कंप.

फांद्या–प्रौढ, वयस्क
जबाबदारीच्या जाणीवेने
जडावलेल्या : स्तब्ध.

पाने : बिचारी अजाण
अकल्पित आघाताने भांबावून गेल्यासारखी
भयग्रस्त : चिडिचिप्प.

आसमंत : ओथंबून आलेले
ओतप्रोत करुणार्त
घरात नुकतेच काही घडून गेल्यासारखे !

आकाश : व्याकुळ
गळ्यातच गर्जित अडकून गुदमरलेल्या
मेघासारखे :

सारे कसे ओशाळवाणे
नजर लपवणारे
शब्द गिळणारे
आपल्याच अनुतापात गूढपणे गढलेले...

घरातल्या कर्त्या पुरुषानें
पार कोलमडून पडावे
असे खरोखर
काय घडले आहे ?

एखाद्या निःस्पंद संध्याकाळी
झाडे अशी का निमूट असतात ?

■

## पुण्य

मातीतिल सुप्त सुरांनी
आपुले पुण्य मज द्यावे
अन् माझ्या दीप्त करांनी
अंतराळ आपंगावे...

निःशक्त होऊनी अंती
कोसळून खाली यावे
येथल्या श्रांत जखमांनी
अन् मला उशाशी घ्यावे !

■

## शकुन

थेंब थेंब कोंब व्हावे
कण कण तृण
बीज भिजू म्हणे, मनी
उद्याचे शकुन.

माती न्हातीधुती, वेडी
झेलण्यास धारा...
ढग ढग ठग झाले
वारा गोरामोरा !

वंचित तरीहि उरी
वासनांचे नभ
कण कण तृण व्हावे
थेंब थेंब कोंब !

■

## वंदन

शतकांचे साहून शाप
जी मने रापली होती
आलास थेंब होवोनी
तू अशा अभाग्यांसाठी !

थरकाप तमाचा करण्या
कोळसे पुन्हा धगधगले
ज्वालांच्या रक्तफुलांनी
तुज पहिले वंदन केले !

■

## कोंब

निळे नितळ आकाश असावे
ओसरणारी पिवळी किरणे
धुंद असावा सायंवारा
स्वयंतृप्त अन् हिरवी कुरणे.

हुळहुळता एकान्त असावा
चित्त असावे उत्कट आतुर
स्तब्ध दूरच्या इमारती परि
वृत्ती व्हाव्या निश्चल कातर.

दूर कोठुनी गीतांसोबत
वासहि यावा बूचफुलांचा
झिळमिळत्या क्षितिजास पडावा
मोह केशरी अबोधतेचा.

लोभसवाणे मुके पाखरू
रांगोळ्या काढीत उडावे
मलाच मी होऊन अनोखा
अपुल्याला हरवून बसावे.

लाल असावी अशीच माती
अन् त्यावरती कोंब कोवळे
आसमंत उन्मनस्क पाहून
झुरे बावरे व्हावे डोळे !

यावेळी वाटते तुझ्यावर
सारे विसरून, सारे विसरून
पुन्हा नव्याने प्रेम करावे
प्रेम करावे पहिल्यापासून !!

□

# फितुर

लाल लाल गाल
तुझे लाल लाल हेतू
माझ्या वठलेल्या मनाशी
त्यांनी बांधला सेतू

त्याच सेतुवरून सये
तुझे बेत चालत आले
माझे फितुर दरवाजे
हात पसरून शरण आले !!

■

## संपले

संपले आयुष्य सारे, संपली नाही तृषा
संपले नाहीत तारे, संपली नाही उषा
संपले नाही उषेने माखलेले अंबर
अंबराला लोंबणारे कांचनाचे झुंबर.

संपली नाही ऋतुंनी मांडलेली संपदा
नाद रंगांचे तराणे... रूप गंधांची अदा
संपले नाही स्मशानी गुंजणारे कोकीळ
जीर्ण आडातील कवळे पिंपळांचे गोकुळ.

संपली नाही जिव्हारी गोंदलेली वेदना
हात मायाळू निनावी पूसणारे लोचना
संपले नाही उखाणे प्राक्तनाने घातलेले
येथल्या खेळात पाची प्राण माझे गुंतलेले...

संपले सारे तरीही संपली नाही तृषा
संपले नाहीत तारे, संपली नाही उषा.

■

## ओळख

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र/व्यू २६०३
६६५८
२।३।८७

आठवले सारे काही
( तू दिलीस ओळख म्हणुनी ! )
: त्या तृषार्त भेटी तुमच्या
नंतरची दीर्घ कहाणी !

आठवले तेव्हाचे ते
रुसणे अन् रडणे हसणे
ते वैतागाने जळणे
जाळणे, जिवावर उठणे.

हळुवारपणाने जपणे
ज्वाळांत, स्वप्न हळवे ते
—अन् तरी अचानक कैसे
होत्याचे होणे नव्हते...

तू दिलीस ओळख म्हणुनी
आठवली सर्व कहाणी
आठवुनी अंत तियेचा
जीवाचे झाले पाणी !!

■

# तुझ्यापुढे

सज्जनांचे परित्राण
दुर्जनांचे निखंदन
योजिले परमात्म्याने
दहा अवतार घेऊन.

खळांचे कुळ दुर्जेय
देवाचा हात दुर्बळ
ईश शक्तीसही तुल्य
दुष्ट वृत्तीच केवळ.

देह संहारुनी, दुष्ट
नष्टले नच सर्वथा
ईशाच्या अवतारांची
दहादा फसली कथा.

'खळांची व्यंकटी सांडो
सत्कर्मी उपजो रती'
मनाच्या मूळ क्रांतीची
संतांची आगळी गती.

देवा, तुझ्यापुढे तुझ्या
भक्तांचा मंत्र धावतो
म्हणुनीच तुझ्या आधी
तयांचे पाय पूजितो !

■

## उष्टावण

हा घास गाउलीचा
हा घास माउलीचा
ज्या शाप देवतांचे
उःशाप मानवाचा.

आषाढ वोपुनीया
आभाळ रिक्त झाले
वात्सल्य श्रावणाचे
धरतीस या मिळाले.

जे जे कुठे अनाथ
जी जी मने उपाशी
ती भूक भागवाया
हा घास आसवांचा.

■

## तुळशीपत्र

डोळ्यांच्या खाचा व्हाव्यात
असे पाहिले
तेव्हा तू कुठे होतीस ?

कानांचे पडदे फाटून जावेत
असे ऐकले
तेव्हा तू कुठे होतीस ?

मेंदूच्या ठिकऱ्या होतील
असे वाटले
तेव्हा तू कुठे होतीस ?

काळजाच्या चिंध्या व्हाव्यात
असे भोगले
तेव्हा तू कुठे होतीस ?

एकट्याच्या बळावर मी
किती आणि काय काय सोसावे ?
असे करू नकोस-- दया कर
जवळ राहात जा.

डोळ्यांच्या खाचा
मेंदूच्या ठिकऱ्या
काळजाच्या चिंध्या
होतात—
तेव्हा तू जवळ हवीस.

तो विध्वंस, तो आक्रांत
ती नृशंसता,
सारे वितळून जातील
सखूच्या सुळासारखे
उरेल फक्त
तुझ्या पतित पावन अस्तित्वाचे
तुळशीपत्र !

■

## बाबा

तू
पुरुषार्थाची प्रेरणा
नियतीच्या निष्ठुरतेशी अश्रांत झुंज
दुःखाच्या कातळातील झऱ्याच्या शोधाची मोहीम.
विनाशाच्या ढिगाऱ्यावर पाय रोवून सृजनाची
सूक्ते आळवणारे आर्ष तपश्चरण.

तू
रोगांचे योगामध्ये रूपांतर करणारी किमया
वेदनांचा वेदान्त पचवून आनंदाचे उपनिषद
उद्‌घोषित करणारा उद्‌गाता,
मातीच्या मातृत्वाचे परिश्रमाच्या पुष्पांनी स्वागत
करणारा पुजारी,
उगारलेल्या रुद्र हातांना
उभारण्याचे भद्र स्वप्न रेखाटण्याचे वेड लावणारा मांत्रिक,
वांझ विचार नि शब्दबंबाळ पांडित्याला
कृतिशीलतेचा प्राणवायू पुरविणारा धन्वंतरी,
भरकटलेल्या दिशाहीन तारुण्याला
अर्थपूर्णतेची वाट दाखवणारा ध्रुवतारा,
सावध घृणेचा नि हिशेबी दयेचा विषय बनलेल्या
बहिष्कृतांना हक्काचे, स्वाभिमानाचे स्वयंपूर्ण पीठ
प्रदान करणारा न्यायमूर्ती

तू
अंधाचे नेत्र नि अपंगाचे गात्र,
रुग्णाचे आरोग्य नि सुखासीनाचे वैराग्य,
शरीराचा घास घेणाऱ्या जन्मव्याधीचे रामबाण औषध,
आणि मनाच्या महारोगावरील अचूक मंत्रोपचार.

तू
सृष्टीतील सुप्त सौंदर्यबीजांच्या जीवनदायी
आविष्काराची आरास.
भूक नि रसज्ञता ह्यांचा मधुरमेळ
रूप नि उपयोगिता ह्यांचा सुंदर संगम
त्यक्तातील लुप्त लावण्याचे दुर्मिळ दर्शन,
बहुरत्ना वसुंधरेचे सुफल प्रणयाराधन.

तू
उपेक्षितांच्या हीनगंडाचा निरास,
दुर्दम्य आत्मविश्वासाची विजययात्रा,
परोपरीच्या परावलंबनाचा परित्याग,
आत्मनिर्भरतेचा विभोर विलास,

तू
निसर्गाने मानवावर लादलेला तहनामा
कृतिगर्भ करुणा, आणि जयिष्णु मानवता.
देहाच्या विच्छिन्न वेरुळातून
कर्तृत्वाचे कैलास लेणे उभारणारा कलावंत
ईश्वरी हातांनी प्राक्तनाच्या प्रस्तरावर शिल्पित केलेले
माणुसकीचे महाकाव्य !

■

# हाच

हाच सिंहासने निर्मितो, मिरवितो
हाच उच्चस्वरे त्यास ' जय ' घोषितो.
आणि तख्तातळी साचलेल्या धुळीला
' जन्मदा ' ' जन्मदा ' म्हणत हा वंदितो.

हाच सिंहासने तोडतो, फोडतो
हाच उच्चस्वरे त्यास धिक्कारतो
आणि तख्तातळी साचलेल्या धुळीला
सत्ताधीशाचा नैवेद्य देतो !

हाच सिंहासने निर्मितो, मिरवितो
त्यावरी मृत्कणालाही अभिषेकितो
खुद्द अन्नाविना पाय रस्त्यावरी
ताणुनी पाय हा पापण्या झाकतो !

■

## निमंत्रण

आंधळ्याने पांगळ्याला पाय द्यावे
पांगळ्याने आंधळ्याला नेत्र द्यावे
आंधळ्या पायातळी रस्ता फुटावा
अन् अपंगाला दिशांनी बोलवावे !

# सोबत

एकदाचा सूर्य आता मावळाया चालला
नेहमीचा ताप त्याचा ओसराया लागला
तिमिरजीवी तारकाही लागल्या घाई कराया
त्या बिचाऱ्यांची प्रतीक्षा एरव्ही जाईल वाया।

कृष्णभक्तांनो, सुखाने झोप घ्या आता घरी
आस ही फारा क्षणांची शेवटी झाली पुरी
वावदूकांनी खुशीने वाजवावी नौबत
तुष्ट घूकांच्या सुरांची मैफलीला सोबत !

■

## एकलेपणाची आग

मी तुझ्याकडे टक लावून पाहात असतो
तेवढ्यावरून आपल्या सौंदर्याबद्दल
गर्व वाटू नकोस
तुझ्या सौंदर्याशी मला काय करायचे आहे ?
तुझ्या डोळ्यातील माझ्या प्रतिबिंबाकडे
पाहत राहणे
ही माझी आवडती सवय आहे !

मी म्हणे एकाग्रतेने तुझे गाणे ऐकत असतो !
हूं :, इतका का तुझा गळा गोड आहे ?
तू गात असताना
तुझे नाजुक ओठ नि टपोरे डोळे
यांची आकर्षक हालचाल
नि चेहऱ्यावरील भुलविणारे भावनर्तन
यांचा मला मोह पडत असतो !

मी जाता येता तुझ्या घरासमोर रेंगाळत असतो
हे आणखी तुझ्या मनात कुणी भरवून दिले ?
च्यायला ! काय कटकट आहे !
इतकी का मला तुझ्या संगतीची
ओढ आहे ?

अग, रस्त्यावरून जाताना तुझ्या
किन्नर कंठातली एकतरी मधुर लकेर कानावर पडेल

या आशेने
आपोआपच माझी पावले तिथे अडखळतात !

तुझे सौंदर्य, तुझे गाणे नि तुझा सहवास
मला खूप खूप आवडतो
असाही तुझा ग्रह झाला आहे ना ?
अरे राम राम ! आता तुला कसे
समजावून सांगू ?
तूच ते गाणे गुणगुणत असतेस ना :
'एकलेपणाची आग लागली हृदया–'

■

# एखादे गाव

२६०३
काव्य २६०५८
२।३।९०

एखादे गाव
अतीताच्या पावलांनी
वर्तमानाच्या राजपथावरून
चालणारे,
आख्यायिकांच्या अन्नावर
बेमुर्वत जगणारे,
वाडवडिलांचा वारसा
निष्क्रीय कृपणतेने
निश्चिंत वापरणारे,
पूर्वजांची पुण्याई
गौरीसारखी सजवून
नवाड्यापुढे मांडणारे;

एखादे गाव
पराक्रमासाठी
फक्त
वाणीवर विसंबणारे,
विक्रमवादी
तसेच समतावादी,
सारस्वताची मारबत

नि दस्यूची मिरवणूक
सारख्याच

हार्दिक उत्साहाने काढणारे.
नव्या आकर्षक
प्रलोभनांच्या प्रदूषणामुळे
परंपराप्राप्त ब्रीदाकडे
सराईतपणे
पाठ फिरवणारे,
दौर्बल्याचे नि प्रमादांचे
सावेश समर्थन करणारे,
नाण्यांच्या नादाचा
निष्ठावंत नाद घेणारे
चिरंतनाला
कालबाह्य म्हणून नाक मुरडणारे,
कापुरुषतेला कंटाळलेल्या
पळत्या लक्ष्मीकडे
हताश होऊन पाहणारे;
एखादे गाव
गावाचा अभिमान असणारे

एखादे गाव
नावाचा अभिमान असणारे
एखादे गाव
अभिमानाचे नाव
हरवून बसणारे
एखादे गाव
हरण्याचाही अभिमान मिरविणारे

अपेशाचा शिरपेच ठेवून
यशाचा करपट दुःस्वास
करणारे
आत्मसंतोषाच्या अभिनिवेशात
पल्वलाला
समुद्र मानणारे

एखादे गाव
ओळखीचेच
तुमच्या आमच्या गावासारखे.

■

## पाऊस

पाऊस पहावा
आभाळाखाली
पाऊस पहावा
मोकळ्या माळावर
पाऊस पहावा
दऱ्या डोंगरात
पाऊस पहावा
दूरच्या खेड्यातील
कौलारू घरांवर
पाऊस पहावा
उंचावरून
गच्चीवरून
गॅलरीतून
खिडकीतून
पाऊस पहावा
पावसात भिजून.

■

# नजर

नजर
स्तिमित, अविश्वासाची
संतप्त : निखारे ओकणारी
शापून टाकणारी,

नजर
घृणा करणारी
कीव करणारी
हतबल, पाणावलेली
चिंब ज्वालेसारखी
समोर...
पतित, अनुतप्त
ओशाळवाणा,
निखाऱ्याची धग
नि शरमेची आच
यांनी ठिक्कर पडलेला.

नजर
अंग अंग सोलणारी
रक्तबंबाळ
वस्त्रे व्यर्थ करणारी
अनादि नि सनातन
नग्नता

जाहीर करणारी
बाजूला...
पिकलेपण, शहाणपण
नि प्रतिष्ठा
या उद्विग्नांचे
निष्ठेच्या नेतृत्वाखाली
तीव्र निषेधार्थ
बहिर्गमन
वितळता ज्वालामुखी
नि मनोमन करपलेला शापित.
ओवाळून फेकलेला
कच्यादांच्या भुकेल्या घाईपुढे

मातृदेवते,
धरणी पोटात घेईल
त्या अगोदर
बिचाऱ्याला वात्सल्याचा
उःशाप दे.

■

## असे जीवन

जीवन पाहिले
पाहू नये असे
जिवंत माणसांचे
माणसांसारखे नसलेले.
गुरे, किडे आणि
अळ्यांसारखे
सरपटणारे,
वळवळणारे,
घाणीला सरावलेले
तीत भर घालणारे
तिने सुखावलेले
रोगप्रवर्तक गटारांचे
निबर शरणार्थी
घोंगावणारी चिलटे
नि चिलीपिली
वाढत्या दुर्गंधीच्या
कुबट कुंजात

शृंगाराची आवर्तने
सृजनाची कीर्तने.
उघड्या आभाळाच्या
जागृत पहाऱ्याखाली
निःसंकोच न्हाणे

कपडे नि केस वाळवणे
प्रसाधनही.
ट्रांझिस्टरचे किंचाळणे
कलहांचा कर्कश कलकलाट
अद्वातद्वा भाषेला
शहारे आणणाऱ्या
अर्वाच्य शिव्या
परस्परांचे उगम
ऐलान करणारे
षष्ठीप्रत्ययी शोध.
या सर्वांवर
उपरतीचा उतारा म्हणून
सार्वजनिक सत्यनारायण !
हे जीवन
सजीव माणसांचे
एकमेकात विरघळलेले
शहरी सीमावादाचा
नि द्वैतबुद्धीचा
प्रतिष्ठेसह
लिलाव मांडणारे
गगनचुंबी
नागर नीतिमत्तेच्या
नि अर्थव्यवस्थेच्या
अंगावर उठलेले
हे ठसठसणारे

नि टचटचलेले
फोड.
आमच्या परीटघडीच्या
अनारोग्याचे
धडधडीत पंचनामे.

तिथले जग : सजलेले
इथले : शिजलेले
कुजलेले
तिथे जीवन सुजलेले
इथे मरणही निजलेले...

■

## काजवे

१.

रूप पाहता लोचनी
खूप भ्याले हो साजणी
तो हा अट्टल लफंगा
भर दिसां येतो अंगा

बहुत प्रकृतीने जाडी
म्हणून गावले तावडी
सर्व चुकांचे आगर
बाप माय घरोघर.

२.

नेतेपण देगा देवा
मुर्गी–बकरीचा मेवा
ऐरावत थोर रत्न
इंद्रपदाचे भूषण

महापूर येती जाती
हेच नेमके वाचती
जया अंगी मोठेपण
तया यातना कोठून ?

३.

हेचि दान देगा देवा
तुझा विसर पडावा
गुण गाईन आवडी
जर लाभेल पोतडी

न लगे फक्त धनसंपदा
रंगढंग देई सदा
नको म्हणे गर्भवास
फुका जन्मायाचा त्रास

आहे जोवर जगणे
सुखे मिळो खाणे पिणे
नेई ऐदीयांच्या गावा
हेचि दान देगा देवा!

४.

भिक्षापात्र अवलंबणे
जळो जिणे लाजिरवाणे
—अरे वारे संतवाणी
खोटेपणाची निशाणी.
सत्याला न मुळी ठाव
अमुचा उलटा अनुभव
पुरे शुष्क उपदेश
बघा म्हणावे भारतवर्ष.

भिक्षापात्र नसते हाती
कसा जगला असता अंती ?
भिक्षापात्रामुळे जिणे
होय कसे गोजिरवाणे.

५.

दारी होतिस उभी आपल्या
पाहत माझी वाट सारखी
आतुरतेचे भाव कितीतरी
खेळत होते मुद्रेवरती
नजीक येता मी सामोरी—
झालिस अन् हासलीस खुदकन्
रोमांचित मम तनू जाहली
हाऽय !— परन्तु, अम्ही 'पोस्टमन्'!

६.

महाभयंकर 'केस' खुनाची
ऐकाया 'हीऽ' गर्दी जमली,
वकिलांच्या वाग्युद्धामाजी
तुल्यबळाने रंगत आली.

आज केसचा निकाल ! तोबा–
दृश्य सर्व ते कोण भयानक !
न्यायमूर्तिंच्या आगमनाने
थरारले समयोत्सुक प्रेक्षक.

क्रूर भोवती नजर फिरवुनी
सावकाश जस्टीस बोलला–
'आमृत्यू फाशीच योग्य; या
प्रकाशवाणी पहावयाला !'

न्या. मू. चे जजूमेंट ऐकुनी
पिंजऱ्यात आरोपी भ्याला,
काकुळतीने त्यास विनवितो–
'मेहर्बान्, फाशीच द्या मला !!'

७.

अवकाशाच्या शेतामध्ये
कितीक कणसे गळून पडती
आणि तयाची दादहि ना घे–
बुजगबाहुली चान्दोबाची !

८.

संसाराच्या झक्क 'स्टेज'वर
स्टण्ट सिनेमा रोज चालतो,
स्त्रीच नायिका असते अर्थात
नवरा (मेला !) 'व्हीलन' बनतो !!

९.

एका सज्जन साधुशील गुरूची गंभीर झाली स्थिती,
त्याला भक्तहि अत्यवस्थ म्हणुनी रुग्णालयी घालती,
बाजीपूर्वक प्राणरक्षण करू धन्वन्तरी धावती,
थोरा वाचवु रक्तदान करण्या सारेच सर्सावती...

दैवानेच मुळात तोहि तिथल्या गर्दीत जो गावला
होते संचित थोर, समयस्फूर्तीत तो धावला,
योगायोग खराच, रक्त जुळता, सत्कर्मि ते वोपले
साधू तो जगला, जनास सकला अन् हायसे वाटले ..

साधू तो जगला, परंतु पुढती साधू न तो राहिला,
तो तितुका चळला, पुराच मळला, दुर्वर्तनी लोळला,
बेटा अट्टल दारुबाज बनुनी भक्तासवे भांडला,
त्यांचा, हे विपरीत रूप बघुनी, मेळाहि भांबावला...

लागे खटपटिने अखेरीस छडा स्थित्यंतराचा पुरा,
ज्याचे रक्त तयास हो पुरविले, होता पुढारी खरा !

■

REFBK-0026058
REFBK-0026058